(४) त्यासाठी माझ्या लेखापरिक्षणामध्ये आर्थिक पत्रकांमध्ये समाविष्ट असलेल्या रकमा व दाखविलेल्या माहिती संबंधित लेखापरिक्षण पुरावे जमा करणेची पध्दत आहे. सदर निवडलेली पध्दत ही लेखापरिक्षकाच्या अंदाजावर तसेच आर्थिक विवरणापत्रकात अपहार किंवा दोषांमुळे होणाऱ्या लक्षणीय चुकांमुळे तयार होणाऱ्या जोखीम मुल्यांकनावर अवलंबून असते. सदर जोखीम मुल्यांकनाची तपासणी करत असताना व तपासणीची पध्दत निवडताना संस्थेने तयार केलेली आर्थिक पत्रके व त्याचे योग्य सादरीकरणेसंबंधात संस्थेमध्ये असणाऱ्या अंतर्गत नियंत्रणाचा लेखापरिक्षक विचार करतात. तसेच आमचे लेखापरिक्षणामध्ये प्रचलित हिशोबी धोरणांची अंमलबजावणी व व्यवस्थापने मांडलेले अंदाज हे सुकृतदर्शनी योग्य आहेत का ? त्याचप्रमाणे आर्थिक पत्रकांचे सर्वसाधारण योग्य असे सादरीकरण केलेले आहे किंवा नाही याचेही परीक्षण केले जाते.

(५) माझ्या लेखापरिक्षणासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती सर्व माहिती, पुरावे व खुलासे मला उपलब्ध झाले आहेत.

**अभिप्राय –**
(६) माझ्या मते आणि आम्हास मिळालेल्या माहिती व खुलाशाच्या आधारे व आवश्यक असलेल्या माहितीच्या आधारे सदर संस्थेचे हिशोब व एकत्रित दिलेल्या टिपणी या महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ व इतर लागू असलेल्या कायद्यानुसार तसेच संस्थांसाठी लागणारे निबंधकाने वेळोवेळी जारी केलेले परिपत्रकानुसार आणि भारतामध्ये सर्वसाधारणपणे वापरली जाणारी हिशोबी तत्वानुसार सत्य व रास्त स्थिती दर्शवितात.
(१) ताळेबंदाचे बाबतीत दिनांक ३१/३/२०२६ ची संस्थेची स्थिती
(२) नफा–तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाचे अगर मुदतीच्या संस्थेच्या नफ्याची सोबत जोडलेल्या लेखापरिक्षण अहवाल भाग अ, ब व क मध्ये केलेल्या अवलोकनास पात्र राहुन सत्य व रास्त स्थिती दर्शवित आहे.

**(७) इतर कायदेशीर व नियमावली संदर्भात अभिप्राय –**
संस्थेचा ताळेबंद व नफा तोटा पत्रक हे महाराष्ट्र सहकारी संस्थेच्या कायद्यातील तरतुदीनुसार तयार करणेत आलेली आहेत.

**(८) मी अहवाल देतो की –**
(अ) माझ्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती सर्व माहिती व खुलासे मला उपलब्ध झाले आहेत व ते पुरेसे आहेत.
(ब) आमच्या तपासणीतून जितपत दृष्टोपत्तीस येईल, त्याप्रमाणे संस्थेने केलेले व्यवहार हे संस्थेच्या अधिकार मर्यादेच्या आतील आहेत.
(क) माझ्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी संस्थेच्या कार्यालयाकडून मिळालेली सर्व प्रकारची कागदपत्रे पुरेशे आहेत.

**(९) आमच्या मते संस्थेच्या ताळेबंद व नफा तोटा पत्रक हे लागू असलेल्या हिशोबी मानंकानुसार आवश्यक ती पूर्तता करतात.**

**(१०) मी पुढे असा अहवाल देतो की –**(१) या अहवालसंदर्भातील ताळेबंद व नफा तोटा पत्रक हे हिशोबाची पुस्तके व विवरणपत्रकानुसार जुळतात. (२) आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोपत्तीस येईल त्यावरुन संस्थेने कायद्यानुसार आवश्यक अशी योग्य ती हिशोबांची पुस्तके ठेवली आहेत. (३) संस्थेच्या हिशोबांचे तपासणी करुन आलेले लेखापरिक्षकाचे अहवाल हे आमचा लेखापरिक्षण अहवाल तयार करताना योग्य त्या ठिकाणी विचारात घेणेत आलेले आहेत. (४) संस्थेस चालू तपासणी कालावधीसाठी ऑडीट **वर्ग 'अ'** देणेत येत आहे.

**स्थळ : अहिल्यानगर**
**दिनांक : ०८/५/२०२६**

**मे. अमर एस. वाघस्कर आणि कं.**
**चार्टर्ड अकौटंटस्**
**अहिल्यानगर**

# लेखा परिक्षकांचा अहवाल

**महाराष्ट्र सहकारी संस्था, कायदा कलम ८१ (५-ब) आणि**
**महाराष्ट्र सहकारी संस्थांचा नियम ६९ अन्वये द्यावयाचा अहवाल**

**मी, अहिल्यानगर जिल्हा परिषद सर्व्हन्टस् को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., अहिल्यानगर या संस्थेचा सोबत जोडलेला दि. ३१/३/२०२६ या दिनांकाचा ताळेबंद व दि. १/४/२०२५ ते दि. ३१/३/२०२६ या सहकारी वर्षाचे नफा तोटा पत्रक तपासले असून अहवाल करतो की,**

(१) हिशोब बनविणे ही संस्थेच्या व्यवस्थापनाची जबाबदारी असून त्यावर मत प्रदर्शन करणे ही आमची जबाबदारी आहे. आम्ही आमचे लेखापरिक्षण भारतातील प्रचलित तपासणीसाठीच्या मानदंडांना अनुसरुन केले आहे. या मानदंडा नुसार आम्हाला आमच्या तपासणीची आखणी आणि अंमलबजावणी अशा प्रकारे करावी लागते की, ज्या योगे ह्या हिशोबात लक्षणीय चुका नाही ह्याची सर्वसाधारण खात्री पटेल. ह्यासाठी आमच्या तापसणी मध्ये चाचणी पद्धतीने मोजक्या व्यवहारासाठी जोडलेले पुरावे तपासले जातात. तपासणी हिशोब मांडणीची मुलतत्वे पाळली जातात किंवा नाही आणि जेथे अंदाज बांधणे आवश्यक असेल तेथे व्यवस्थापनाने मांडलेले अंदाज हे सुकृतदर्शनी योग्य आहेत की नाही याची पडताळणी केली जाते. आमच्या मते या हिशोबांवर मत प्रदर्शन करण्यासाठी या पद्धती प्रचलित कायदे व मानदंडानुसार पुरेशा आहेत.

(२) माझ्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खालील प्रमाणे जरुर ती माहिती व खुलासे उपलब्ध झाले आहे.

(३) आमच्या पुस्तकाच्या तपासणीतून जितपत दृष्टीत्पत्तीस येईल त्यावरुन संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्थांना कायदा १९६० व त्या खालील नियम व संस्थेचे पोटनियमान्वये अपेक्षित असल्याप्रमाणे योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

(४) आम्ही तपासलेले ताळेबंद व नफा तोटा पत्रक संस्थेच्या हिशोबाच्या पुस्तकाशी व विवरणाशी जुळते आहे.

(५) आमच्या मते व आमच्या संपूर्ण माहितीप्रमाणे तसेच आम्हांला देण्यात आलेल्या खुलाश्यावरुन हे हिशोब महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० व त्या खालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी सर्व माहिती देतात आणि –

(अ) ताळेबंदाच्या बाबतीत दि. ३१/३/२०२६ ची संस्थेची स्थिती आणि

(ब) नफा तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाचे अगर मुदतीच्या नफ्याची आमच्या सोबत जोडलेल्या अभिप्रायासह अगर स्वतंत्र लेखापरिक्षण अहवालामध्ये केलेल्या अवलोकनास पात्र राहून सत्य व रास्त स्थिती दर्शवीत आहे.

**श्री. उद्धव निवृत्ती खांदवे**
अंतर्गत लेखा परिक्षक
अहिल्यानगर

**दिनांक :** २०/४/२०२६
**स्थळ : अहिल्यानगर**

# अहिल्यानगर जिल्हा परिषद सर्व्हन्टस् को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., अहिल्यानगर

## ताळेबंद पत्रक दिनांक ३१/३/२०२६ अखेर

| ३१/३/२०२५ रक्कम पैसे | भांडवल व देणी | रक्कम रुपये | ३१/३/२०२६ रक्कम पैसे |
|---|---|---|---|
| ४०,००,००,०००=०० | अधिकृत भाग भांडवल | . | ४०,००,००,०००=०० |
| २५,८१,४६,५००=०० | वसुल भाग भांडवल (सभासद वर्गणी) | २७,१७,६३,५००=०० | २७,१७,६३,५००=०० |
| | फंडस | | |
| १५,१०,९७,०३१=५१ | रिझर्व्ह फंड | १६,१२,५९,७५७=८५ | |
| २६,८९,३४९=७२ | डिव्ही. इक्वीलाझेशन फंड | २९,८९,३४९=७२ | |
| ३०,२३,३२४=०० | इमारत फंड | ३५,२३,३२४=०० | |
| ३,६३,५३५=०० | सार्वजनिक कार्यासाठी अंशदान फंड | ४,६३,५३५=०० | |
| ३१,३२,१४२=०० | डेडस्टॉक झिज फंड | ३१,३२,१४२=०० | |
| ४९,६९,८९३=५० | स्टाफ ग्रॅच्यु. योजना फंड | ५६,७४,८२०=५० | |
| ६२,५५,२७५=७५ | स्टाफ प्रॉव्हीडंड फंड | ६३,१३,१२४=७५ | |
| ३५,४२,४४०=०० | गटविमा योजना फंड | ३८,४२,१९९=०० | |
| ८२,१२,३१५=०० | कर्मचारी पेंशन योजना फंड | ९२,३०,७२६=०० | |
| १४,६१,५५९=०० | स. प्रशिक्षण व प्रसिध्दी फंड | १७,९६,७१०=०० | |
| ६८,८४,९१४=०० | स्टाफ पगार फंड | ९०,३०,४३२=०० | २०,७२,५६,१२०=८२ |
| | ठेवी | | |
| २,०७,९००=०० | मेंबर ठेव | ८,३२,०००=०० | |
| ३०,२९,५७,०००=०० | कायम निधी | २७,७५,६०,०००=०० | |
| १३६,९५,२५,३९५=०० | मेंबर मुदत ठेव | १५५,७४,५५,८३८=०० | |
| २,३४,५००=०० | मेंबर पेंशन ठेव | १,६७,५००=०० | |
| ७२,७७,०००=०० | रिकरींग डिपॉझिट | ७४,४१,०००=०० | |
| १९,८४,९५०=०० | एम.आय.एस. | ३६,७६,०००=०० | |
| ७५,३३,०००=०० | सभासद कुटूंबआधार योजना | ५१,८२,०००=०० | |
| ५,८५,००,०००=०० | सभासद कुटूंब आ. योजना मुदतठेव | ९,५६,८०,०००=०० | १९४,७९,९४,३३८=०० |
| २१९,७९,९८,०२४=४८ | पुढील पानावर चालू... | | २४२,७०,१३,९५८=८२ |

## अहिल्यानगर जिल्हा परिषद सर्व्हन्टस् को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., अहिल्यानगर

### ताळेबंद पत्रक दिनांक ३१/३/२०२६ अखेर

| ३१/३/२०२५ रक्कम पैसे | जिंदगी व येणी | रक्कम रुपये | ३१/३/२०२६ रक्कम पैसे |
|---|---|---|---|
| ४१५=०० | रोख शिल्लक | ३८९=०० | ३८९=०० |
| . | बँकेतील शिल्लक | . | |
| १,१७,२४०=८० | अ.नगर डि.बँक बचत खाते | २१,२५,०७२=८० | |
| २१,६७९=५० | अ.नगर डि.बँक सेव्हिंग्ज ग्रॅच्युटी | २२,३३४=५० | |
| ३,९०४=०० | अ.नगर डि.बँक करंट | ३,९०४=०० | |
| १०,२७,०७८=०० | कर्मचारी पेंशन (एडीसीसी बँक) | १६,३९,०८१=०० | |
| १,८८,३३९=०० | कर्मचारी गट विमा सेव्हिंग्ज | २,३०,४८३=०० | |
| १२,८२,७३६=७५ | कर्मचारी प्रा. फंड सेव्हिंग्ज | १०,१५,९०६=७५ | |
| १६,८३,५५०=४५ | भारतीय स्टेट बँक करंट खाते | ३,७३,८६०=११ | ५४,१०,६४२=१६ |
| | गुंतवणूक | | |
| १,४०,००,०००=०० | सहकार बँक शेअर्स | १,४०,००,०००=०० | |
| १००=०० | दुध उत्पादक शेअर्स | १००=०० | |
| १,०००=०० | ग्राहक भांडार | १,०००=०० | |
| ५००=०० | राष्ट्रीय कर्जरोखा | ५००=०० | |
| २५,५८,९४,६१८=२८ | नॉन रि.रि. फंड | २५,६४,३४,०१०=६२ | |
| ४९,४८,२१४=०० | कॅश सर्टिफिकेट ग्रॅ. फंड | ५६,५२,४८६=०० | |
| ३३,५४,१०१=०० | कॅश सर्टिफिकेट गट विमा | ३६,११,७१६=०० | |
| ७१,८५,२३७=०० | कॅश सर्टिफिकेट क. पेन्शन | ७५,९१,६४५=०० | |
| ४९,७२,५३९=०० | कॅश सर्टिफिकेट स्टाफ प्रा. फंड | ५२,९७,२१८=०० | |
| १०००=०० | तालुका फेडरेशन शेअर्स | १,०००=०० | |
| १६,२५,०२,६५१=०० | जिल्हा बँक मुदत ठेव | १६,९८,२६,८३४=०० | |
| ११,४५,५७३=०० | कॅश सर्टिफिकेट स.प्रशि. व प्र.फंड | १५,२२,३७६=०० | |
| ६८,८४,९१४=०० | स्टाफ पगार कॅश सर्टिफिकेट | ९०,३०,४३२=०० | ४७,२९,६९,३१७=६२ |
| | सभासद कर्ज | | |
| १६४,४३,२०,८००=०० | सर्वसाधारण कर्ज | १७७,८२,०७,१००=०० | |
| १,४०,४२,६००=०० | तातडी कर्ज | १,३०,७५,१००=०० | |
| ३७,९९,४००=०० | शैक्षणिक कर्ज | ३५,०४,३००=०० | १७९,४७,८६,५००=०० |
| २१२,७३,७८,१९०=७८ | पुढील पानावर चालू... | | २२७,३१,६६,८४८=७८ |

# अहिल्यानगर जिल्हा परिषद सर्व्हन्टस् को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., अहिल्यानगर

## ताळेबंद पत्रक दिनांक ३१/३/२०२६ अखेर

| ३१/३/२०२५ रक्कम पैसे | भांडवल व देणी | रक्कम रुपये | ३१/३/२०२६ रक्कम पैसे |
|---|---|---|---|
| २१९,७९,९८,०२४=४८ | मागील पानावरुन... | . | २४२,७०,१३,९५८=८२ |
| २१,०७३=०० | बँक कॅश क्रेडीट | ५५,१९२=१६ | ५५,१९२=१६ |
| | <u>इतर देणे व तरतूदी</u> | | |
| ३,६२१=५३ | लाभांश | ००=०० | |
| ३,४१३=४३ | कायम निधी व्याज मागील | ००=०० | |
| २५,३१,३९३=०० | सोसायटी इन्कम टॅक्स तरतूद | २६,११,३९३=०० | |
| १,०५०=०० | सोसायटी व्यवसाय कर तरतूद | ५००=०० | |
| ६,८५,१०५=०० | महानगरपालिका टॅक्स तरतूद | ८,०९,९५०=०० | |
| १२,७३,२९२=०० | संगणक तरतूद | १३,५३,६४२=०० | |
| १५,००,०००=०० | ऑडिट फी तरतूद | १७,००,०००=०० | |
| २१,००,०००=०० | कर्मचारी पेन्शन तरतूद | २०,००,०००=०० | |
| २८२,८८,९३०=०० | कायम निधी व्याज तरतूद | २,६०,५३,६३९=०० | |
| १६,१७,९०१=०० | इमारत दुरुस्ती व देखभाल खर्च | २५,०१,९२८=०० | |
| ९,१४,५९८=०० | एन पी ए तरतुद | १७,१४,५९८=०० | |
| १०,५२,४९५=०० | निवडणूक खर्च तरतूद | १२,५२,४९५=०० | |
| ४१,५०,०००=०० | मुदत ठेव व्याज देणे तरतूद | ९१,४४,३६१=०० | |
| ५,००,०००=०० | थकीत व्याजाची तरतूद | ३,००,०००=०० | |
| ५,००,०००=०० | स्टाफ ग्रॅज्युएटी योजना तरतूद | २,००,०००=०० | |
| १६,४९,८०५=०० | स्टाफ पगार तरतूद | १७,००,०००=०० | |
| ३,००,०००=०० | सहकार प्रशिक्षण व प्रसिद्धी फंड तरतुद | १,००,०००=०० | |
| २००=०० | अधेसिव्ह स्टॅम्प तरतूद | ४००=०० | |
| ५,००,०००=०० | इमारत फंड तरतूद | ३,००,०००=०० | |
| ३,००,०००=०० | डिव्हीडंड इक्वीलायझेन तरतूद | २,००,०००=०० | |
| १,००,०००=०० | सार्वजनिक कार्यासाठी अंशदान तरतूद | ३,००,०००=०० | |
| १५,००,०००=०० | सभासद कल्याण निधी तरतूद | १५,७७,०००=०० | |
| १,००,००,०००=०० | नॉन रिफंडबेल रि.फंड कर्ज हप्ता तरतूद | १,००,००,०००=०० | |
| २,९६,१५,१२४=०० | सभासद वर्गणी व्याज देणे तरतूद | ३,०९,७७,५८०=०० | |
| ००=०० | बांधकाम रॉयल्टी | १,४९,२९४=०० | |
| ००=०० | CGST+SGST बांधकाम | ४,३८,९१८=०० | |
| ००=०० | सुरक्षा ठेव | ४,३८,९१८=०० | |
| | | | ९,५८,२४,६१६=०० |
| | <u>नफा-तोटा खाते</u> | | |
| ४१,५१७=८४ | मागील वर्षाचा शिल्लक नफा | ००=०० | |
| ५३,८०८=५० | मार्च २०२६ अखेर शिल्लक नफा | ५१,९९०=८० | |
| | | | ५१,९९०=८० |
| २२८,७२,०१,३५१=७८ | | | २५२,२९,४५,७५७=७८ |

# अहिल्यानगर जिल्हा परिषद सर्व्हन्टस् को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., अहिल्यानगर

## ताळेबंद पत्रक दिनांक ३१/३/२०२६ अखेर

| ३१/३/२०२५ रक्कम पैसे | जिंदगी व येणी | रक्कम रुपये | ३१/३/२०२६ रक्कम पैसे |
|---|---|---|---|
| २१२,७३,७८,१९०=७८ | मागील पानावरुन... | | २२७,३१,६६,८४८=७८ |
| | **इतर येणी** | | |
| २२५००=०० | दिवाळी ॲडव्हान्स | २०,०००=०० | |
| ७,२०,१५,१६४=०० | व्याज येणे सभासदाकडून | ११,८४,४५,२३०=०० | |
| ६४,६३,०९०=०० | जि.म. बँक मुदतठेव व्याज येणे | २,२६,३४,५७६=०० | |
| ९०,३५,४१३=०० | सोसायटी इन्कम टॅक्स येणे | ९०,३५,४१३=०० | १५,०१,३५,२१९=०० |
| | **जंगम व मालमत्ता** | | |
| १,९०,७१,५८७=०० | जुनी इमारत बांधकाम | १,९०,७१,५८७=०० | |
| ७०,४९,७३७=०० | डेड स्टॉक (इले. फिटींग/फर्निचर) | ७०,४९,७३७=०० | |
| २,६७०=०० | लायब्ररी | २,६७०=०० | |
| ४,६१,६३,०००=०० | इमारत जागा | ४,६१,६३,०००=०० | |
| ००=०० | नविन इमारत बांधकाम | २,७३,५६,६९६=०० | ९,९६,४३,६९०=०० |
| २२८,७२,०१,३५१=७८ | | | २५२,२९,४५,७५७=७८ |

| | | |
|---|---|---|
| श्री. अर्जुन दिगंबर मंडलिक<br>व्हा. चेअरमन | श्री. उद्धव निवृत्ती खांदवे<br>अंतर्गत लेखापरिक्षक | श्री. संजय सुदाम कडूस<br>चेअरमन |
| श्री. प्रशांत मुरलीधर लोखंडे<br>उपव्यवस्थापक | मे. अमर एस. वाघस्कर ॲण्ड कं.<br>चार्टर्ड अकौंटंट | श्री. राजेंद्र दशरथ पवार<br>व्यवस्थापक |

### –: संचालक मंडळ :–

| | | |
|---|---|---|
| श्री. प्रशांत नामदेव मोरे | श्री. चंद्रकांत फकिरा संसारे | श्री. काशिनाथ बबन नरोडे |
| श्री. विक्रम सुर्यभान ससे | श्री. ऋषिकेश कैलास बनकर | श्री. कैलास कारभारी डावरे |
| श्री. विलास लहानु शेळके | श्री. स्वप्नील सुखलाल शिंदे | श्री. योगेंद्र महादेव पालवे |
| श्री. अरुण लहानु जोर्वेकर | श्रीमती ज्योती साहेबराव पवार | श्रीमती सुरेखा बबन महारनूर |
| श्री. भाऊसाहेब सोन्याबापु चांदणे | श्री. कल्याण रामदास मुटकुळे | श्रीमती मनिषा भिकचंद साळवे |
| इंजि. राजु ठकाजी दिघे | श्री. सुधीर भानुदास खेडकर | श्री. अभिजीत अनिलसिंग पवार |
| डॉ. दिलीप दत्तात्रय डांगे | श्री. श्रीकांत गोपीनाथ देशमाने | श्री. चेतन रविंद्र चव्हाण |

## अहिल्यानगर जिल्हा परिषद सर्व्हन्टस् को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., अहिल्यानगर

### दिनांक १/४/२०२५ ते ३१/३/२०२६ अखेर नफा–तोटा पत्रक

| ३१/३/२०२५ रक्कम पैसे | खर्च | ३१/३/२०२६ रक्कम पैसे |
|---|---|---|
| ९,१५,३५,७९२=०० | मुदत ठेव व्याज | ११,९८,०१,२९०=०० |
| ४३,४०,७१०=०० | पगार खर्च | ४६,४८,२०६=०० |
| १९,६००=०० | ऑफिस खर्च | १९,५००=०० |
| ४२,५१५=०० | स्टेशनरी | १८,०००=०० |
| ९८,८४४=०० | लाईट बील | ४५,७१४=०० |
| ४,५०,३९६=०० | मिटींग व प्रवास भत्ता | ६,९४,४०८=०० |
| ४,१५८=०० | टेलिफोन बील | ३,७१९=०० |
| १५,५००=०० | किरकोळ खर्च | १९,०००=०० |
| १,३५,६२५=०० | जनरल मिटींग खर्च | १,५६,४१५=०० |
| ३,६६,०२६=०० | एम.आय.एस. व्याज | १,२८,४२९=०० |
| २,८५,३०८=०० | आर.डी. व्याज | २,६१,५८३=०० |
| ९३,२९४=५० | बँक कॅश क्रेडीट व्याज | ००=०० |
| ४२,०००=०० | सभासद पेन्शन ठेव व्याज | ७९,०००=०० |
| ३५,२९२=०० | जाहिरात खर्च | २६,६५२=०० |
| ७४,४२५=०० | प्रिटींग खर्च | ८१,५३९=०० |
| ००=०० | कोर्ट खर्च | ५,००,०००=०० |
| २,००,०००=०० | संगणक (तरतूद) | २,००,०००=०० |
| १५,००,०००=०० | सभासद कल्याण निधी (तरतुद) | ५,००,०००=०० |
| १६,४९,८०५=०० | स्टाफ पगार (तरतूद) | १७,००,०००=०० |
| १५,००,०००=०० | ऑडीट फी (तरतूद) | १७,००,०००=०० |
| ५,००,०००=०० | एन पीए (तरतुद) | ३,००,०००=०० |
| २००=०० | सोसायटी व्यवसाय कर (तरतुद) | २००=०० |
| १,००,००,०००=०० | नॉन रिफंडेबल कर्ज हप्ता (तरतुद) | १,००,००,०००=०० |
| | | |
| | | |
| | | |
| ११,२८,८९,४९०=५० | एकूण | १४,०८,८३,६५५=०० |

## अहिल्यानगर जिल्हा परिषद सर्व्हन्टस् को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., अहिल्यानगर

### दिनांक १/४/२०२५ ते ३१/३/२०२६ अखेर नफा-तोटा पत्रक

| ३१/३/२०२५ रक्कम पैसे | मिळकत | ३१/३/२०२६ रक्कम पैसे |
|---|---|---|
| १६,४९,४५,०८८=०० | व्याज जमा कर्जावरील | २०,८९,३७,५१४=८० |
| ००=०० | बँक रिबेट | २९,९६६=०० |
| १,३४,३७,०८०=०० | मुदतठेव व्याज (जिल्हा बँक) | २५,४३,९४५=०० |
| ३५,४००=०० | इतर टेंडर जमा | ००=०० |
| ३६,८०,०००=०० | सभासद कुटूंबआधार मुदतठेव व्याज जमा | ००=०० |
| १८,२०,९७,५६८=०० | एकूण | २१,१५,११,४२५=८० |

## अहिल्यानगर जिल्हा परिषद सर्व्हन्टस् को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., अहिल्यानगर

### दिनांक १/४/२०२५ ते ३१/३/२०२६ अखेर नफा-तोटा पत्रक

| ३१/३/२०२५ रक्कम पैसे | खर्च | ३१/३/२०२६ रक्कम पैसे |
|---|---|---|
| ११,२८,८९,४९०=५० | मागील पानावरुन | १४,०८,८३,६५५=०० |
| ४१,५०,०००=०० | मुदत ठेव व्याज देणे (तरतूद) | ९१,४४,३६१=०० |
| २१,००,०००=०० | कर्मचारी पेन्शन (तरतूद) | २०,००,०००=०० |
| २००=०० | अधेसिव्ह स्टॅम्प (तरतूद) | २००=०० |
| २,९६,१५,१२४=०० | कायम निधी व्याज (तरतूद) | २,६०,५३,६३९=०० |
| ५,००,०००=०० | निवडणुक खर्च (तरतूद) | २,००,०००=०० |
| २,८२,८८,९३०=०० | सभासद वर्गणी व्याज देणे (तरतूद) | ३,०९,७७,५८०=०० |
| १०,००,०००=०० | सोसायटी इन्कमटॅक्स (तरतुद) | २,००,०००=०० |
| २,७१,४५५=०० | सभासद कल्याणनिधी खर्च | ००=०० |
| २८,५६०=०० | नविन इमारत बांधकाम खर्च | ००=०० |
| ५,००,०००=०० | महानगर पालिका टॅक्स (तरतूद) | ३,००,०००=०० |
| ५,००,०००=०० | इमारत दुरुस्ती व देखभाल (तरतूद) | ३,००,०००=०० |
| ३,००,०००=०० | सहकार प्रशिक्षण व प्रसिद्धी फंड (तरतूद) | १,००,०००=०० |
| ५,००,०००=०० | स्टाफ ग्रॅज्युएटी योजना फंड (तरतूद) | २,००,०००=०० |
| ५,००,०००=०० | थकीत व्याजाची (तरतूद) | ३,००,०००=०० |
| ५,००,०००=०० | इमारत फंड (तरतूद) | ३,००,०००=०० |
| १,००,०००=०० | सार्वजनिक कार्यक्रमासाठी अंशदान (तरतूद) | ३,००,०००=०० |
| ३,००,०००=०० | डिव्हिडंड इक्वीलायझेशन फंड (तरतूद) | २,००,०००=०० |
| ५३,८०८=५० | ३१ मार्च २०२६ अखेर शिल्लक नफा | ५१,९९०=८० |
| १८,२०,९७,५६८=०० | एकूण | २१,१५,११,४२५=८० |

श्री. अर्जुन दिगंबर मंडलिक
व्हा. चेअरमन

श्री. संजय सुदाम कडूस
चेअरमन

श्री. प्रशांत मुरलीधर लोखंडे
उपव्यवस्थापक

श्री. राजेंद्र दशरथ पवार
व्यवस्थापक

श्री. उद्धव निवृत्ती खांदवे
अंतर्गत लेखापरिक्षक

मे. अमर एस. वाघस्कर ॲण्ड कं.
चार्टर्ड अकौंटंट

## अहिल्यानगर जिल्हा परिषद सर्व्हन्टस् को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., अहिल्यानगर

### दिनांक १/४/२०२५ ते ३१/३/२०२६ अखेर नफा–तोटा पत्रक

| ३१/३/२०२५<br>रक्कम पैसे | मिळकत | ३१/३/२०२६<br>रक्कम पैसे |
|---|---|---|
| १८,२०,९७,५६८=०० | मागील पानावरुन | २१,१५,११,४२५=८० |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| १८,२०,९७,५६८=०० | एकूण | २१,१५,११,४२५=८० |

–: संचालक मंडळ :–

श्री. प्रशांत नामदेव मोरे
श्री. विक्रम सुर्यभान ससे
श्री. विलास लहानु शेळके
श्री. अरुण लहानु जोर्वेकर
श्री. भाऊसाहेब सोन्याबापु चांदणे
इंजि. राजु ठकाजी दिघे
डॉ. दिलीप दत्तात्रय डांगे
श्री. चंद्रकांत फकिरा संसारे
श्री. ऋषिकेश कैलास बनकर
श्री. स्वप्नील सुखलाल शिंदे
श्रीमती ज्योती साहेबराव पवार
श्री. कल्याण रामदास मुटकुळे
श्री. सुधीर भानुदास खेडकर
श्री. श्रीकांत गोपीनाथ देशमाने
श्री. काशिनाथ बबन नरोडे
श्री. कैलास कारभारी डावरे
श्री. योगेंद्र महादेव पालवे
श्रीमती सुरेखा बबन महारनूर
श्रीमती मनिषा भिकचंद साळवे
श्री. अभिजीत अनिलसिंग पवार
श्री. चेतन रविंद्र चव्हाण

# सन २०२५-२०२६ तरतूदीची वर्गवारी

संस्थेला २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात ८,५०,२७,९७०=८० एकूण ढोबळ नफा झालेला असून सदर नफ्यातून आवश्यक त्या तरतूदी रु. ८,४९,७५,९८०/- केल्यानंतर रु. ५१,९९०=८० शिल्लक नफा राहिलेला आहे.

## तरतूदीची वर्गवारी

| | | |
|---|---|---|
| १ | सभासद वर्गणी व्याज देणे तरतुद १२% | ३,०९,७७,५८०=०० |
| २ | सभासद कायमनिधी व्याज देणे तरतूद ९% | २,६०,५३,६३९=०० |
| ३ | आवश्यक इतर तरतूदी | २,७९,४४,७६१=०० |
| ४ | शिल्लक नफा | ५१,९९०=८० |
| ५ | ढोबळ नफा | ८,५०,२७,९७०=८० |

**श्री. अर्जुन दिगंबर मंडलिक**
**व्हा. चेअरमन**

**श्री. संजय सुदाम कडूस**
**चेअरमन**

**श्री. प्रशांत मुरलीधर लोखंडे**
**उपव्यवस्थापक**

**श्री. राजेंद्र दशरथ पवार**
**व्यवस्थापक**

### -: संचालक मंडळ :-

| | | |
|---|---|---|
| श्री. प्रशांत नामदेव मोरे | श्री. चंद्रकांत फकिरा संसारे | श्री. काशिनाथ बबन नरोडे |
| श्री. विक्रम सुर्यभान ससे | श्री. ऋषिकेश कैलास बनकर | श्री. कैलास कारभारी डावरे |
| श्री. विलास लहानु शेळके | श्री. स्वप्नील सुखलाल शिंदे | श्री. योगेंद्र महादेव पालवे |
| श्री. अरुण लहानु जोर्वेकर | श्रीमती ज्योती साहेबराव पवार | श्रीमती सुरेखा बबन महारनूर |
| श्री. भाऊसाहेब सोन्याबापु चांदणे | श्री. कल्याण रामदास मुटकुळे | श्रीमती मनिषा भिकचंद साळवे |
| इंजि. राजु ठकाजी दिघे | श्री. सुधीर भानुदास खेडकर | श्री. अभिजीत अनिलसिंग पवार |
| डॉ. दिलीप दत्तात्रय डांगे | श्री. श्रीकांत गोपीनाथ देशमाने | श्री. चेतन रविंद्र चव्हाण |

# सन २०२५-२०२६ सालचे अंदाजे खर्चाचा अर्थसंकल्प

| खर्चाचा तपशील | अंदाजलेला खर्च २०२५-२०२६ | | प्रत्यक्ष झालेला खर्च २०२५-२०२६ | अंदाजलेला खर्च २०२६-२०२७ |
|---|---|---|---|---|
| मुदत ठेव व्याज | १०,००,००,०००.०० | प्रत्यक्ष खर्च | ११,९८,०१,२९०.०० | १३,२५,००,०००.०० |
| पगार खर्च | ४५,००,०००.०० | प्रत्यक्ष खर्च | ४६,४८,२०६.०० | ५०,००,०००.०० |
| ऑफिस खर्च | ५०,०००.०० | प्रत्यक्ष खर्च | १९,५००.०० | ५०,०००.०० |
| स्टेशनरी व प्रिंटिंग | १,५०,०००.०० | प्रत्यक्ष खर्च | ९९,५३९.०० | १,५०,०००.०० |
| लाईट बिल | १,००,०००.०० | प्रत्यक्ष खर्च | ४५,७१४.०० | ६०,०००.०० |
| मिटिंग व प्र.भत्ता | ६,००,०००.०० | प्रत्यक्ष खर्च | ६,९४,४०८.०० | ७,००,०००.०० |
| किरकोळ खर्च | ५०,०००.०० | प्रत्यक्ष खर्च | १९,०००.०० | ६०,०००.०० |
| टेलीफोन बिल | ५,०००.०० | प्रत्यक्ष खर्च | ३,७१९.०० | १०,०००.०० |
| जनरल मिटिंग खर्च | १,५०,०००.०० | प्रत्यक्ष खर्च | १,५६,४१५.०० | १,६०,०००.०० |
| एम आय एस व्याज | ४,००,०००.०० | प्रत्यक्ष खर्च | १,२८,४२९.०० | १,३०,०००.०० |
| सभासद आर डी व्याज | ३,००,०००.०० | प्रत्यक्ष खर्च | २,६१,५८३.०० | २,७०,०००.०० |
| कॅश क्रेडिट कर्ज व्याज | १,००,०००.०० | प्रत्यक्ष खर्च | ००.०० | ००.०० |
| जाहिरात खर्च | ५०,०००.०० | प्रत्यक्ष खर्च | २६,६५२.०० | ३०,०००.०० |
| सभासद पेन्शन व्याज | ४२,०००.०० | प्रत्यक्ष खर्च | ७९,०००.०० | ३०,०००.०० |
| कोर्ट खर्च व हाय कोर्ट वकील फी | २,००,०००.०० | प्रत्यक्ष खर्च | ५,००,०००.०० | ५,००,०००.०० |
| सभासद कल्याणनिधी खर्च | ३,००,०००.०० | प्रत्यक्ष खर्च | ००.०० | ००.०० |
| सोसायटी इन्कमटॅक्स तरतुद | १०,००,०००.०० | तरतुद जमा | २,००,०००.०० | २,००,०००.०० |
| ऑडीट फी खर्च तरतूद | १५,००,०००.०० | तरतुद जमा | १७,००,०००.०० | १७,००,०००.०० |
| कायम निधी व्याज तरतूद | ३,००,००,०००.०० | तरतुद जमा | २,६०,५३,६३९.०० | २,७०,००,०००.०० |
| नॉन रिफंडेबल रि.फंड कर्ज हप्ता | १,००,००,०००.०० | तरतुद जमा | १,००,००,०००.०० | १,००,००,०००.०० |
| पुढील पानावर | १४,९४,९७,०००.०० | | १६,४४,३७,०९४.०० | १७,८५,५०,०००.०० |

# सन २०२५-२०२६ सालचे अंदाजे खर्चाचा अर्थसंकल्प

| खर्चाचा तपशील | अंदाजलेला खर्च २०२५-२०२६ | | प्रत्यक्ष झालेला खर्च २०२५-२०२६ | अंदाजलेला खर्च २०२६-२०२७ |
|---|---|---|---|---|
| मागील पानावरुन... | १४,९४,९७,०००.०० | तरतुद जमा | १६,४४,३७,०९४.०० | १७,८५,५०,०००.०० |
| संगणक तरतूद | २,००,०००.०० | तरतुद जमा | २,००,०००.०० | ३,००,०००.०० |
| अधेसिव्ह स्टॅम्प तरतुद | २००.०० | तरतुद जमा | २००.०० | २००.०० |
| कर्मचारी पेन्शन तरतुद | २१,००,०००.०० | तरतुद जमा | २०,००,०००.०० | २०,००,०००.०० |
| निवडणूक खर्च तरतुद | ५,००,०००.०० | तरतुद जमा | २,००,०००.०० | ५,००,०००.०० |
| स्टाफ पगार तरतुद | १७,००,०००.०० | तरतुद जमा | १७,००,०००.०० | १७,००,०००.०० |
| मुदत ठेव व्याज देणे तरतुद | ५०,००,०००.०० | तरतुद जमा | ९१,४४,३६१.०० | १,००,००,०००.०० |
| इमारत दुरुस्ती व देखभाल | ५,००,०००.०० | तरतुद जमा | ३,००,०००.०० | ५,००,०००.०० |
| थकबाकी  व्याज तरतुद | ५,००,०००.०० | तरतुद जमा | ३,००,०००.०० | ३,००,०००.०० |
| इमारत फंड तरतुद | ५,००,०००.०० | तरतुद जमा | ३,००,०००.०० | २,००,०००.०० |
| सहकार प्र.फंड तरतुद | ३,००,०००.०० | तरतुद जमा | १,००,०००.०० | २,००,०००.०० |
| डिव्हीडंड इक्वीलायझेशन फंड तरतुद | ३,००,०००.०० | तरतुद जमा | २,००,०००.०० | २,००,०००.०० |
| स्टाफ ग्रॅज्युएटी योजना फंड तरतुद | ५,००,०००.०० | तरतुद जमा | २,००,०००.०० | २,००,०००.०० |
| एन पी ए. तरतुद | ५,००,०००.०० | तरतुद जमा | ३,००,०००.०० | ३,००,०००.०० |
| सोसायटी व्यवसाय कर तरतुद | २००.०० | तरतुद जमा | २००.०० | २००.०० |
| म.ना.पा टॅक्स तरतूद | ५,००,०००.०० | तरतुद जमा | ३,००,०००.०० | ३,००,०००.०० |
| सभासद वर्गणी व्याज देणे तरतुद | ३,००,००,०००.०० | तरतुद जमा | ३,०९,७७,५८०.०० | ३,२०,००,०००.०० |
| सार्वजनिक कार्यासाठी अंशदान तरतुद | १,००,०००.०० | तरतुद जमा | ३,००,०००.०० | ३,००,०००.०० |
| सभासद कल्याण निधी तरतुद | १५,००,०००.०० | तरतुद जमा | ५,००,०००.०० | ५,००,०००.०० |
| शिल्लक नफा | १,००,०००.०० | | ५१,९९०.८० | ६०,०००.०० |
| एकूण रक्कम रु. | १९,४२,९७,४००.०० | | २१,१५,११,४२५.८० | २२,८१,१०,४००.०० |

# सन २०२५-२०२६ सालचे अंदाजे उत्पन्नाचा अर्थसंकल्प

| उत्पन्नाचा तपशील | अंदाजलेले उत्पन्न २०२५–२०२६ | प्रत्यक्ष झालेले उत्पन्न २०२५–२०२६ | अंदाजलेले उत्पन्न २०२६–२०२७ |
|---|---|---|---|
| व्याज जमा कर्जावरील | १७,००,००,०००.०० | २०,८९,३७,५१४.८० | २३,४०,००,०००.०० |
| (जिल्हा बँक) मुदत ठेव व्याज जमा | १,३०,००,०००.०० | २५,४३,९४५.०० | ३०,००,०००.०० |
| बँक रिबेट | ००.०० | २९,९६६.०० | ४०,०००.०० |
| जिल्हा बँक मुदतठेव व्याज येणे | ७०,००,०००.०० | .०० | .०० |
| सभासद कुटूंबआधार विमा योजना | ४६,८०,०००.०० | .०० | .०० |
| एकूण रक्कम रुपये | १९,४६,८०,०००.०० | २१,१५,११,४२५.८० | २३,७०,४०,०००.०० |

श्री. अर्जुन दिगंबर मंडलिक
व्हा. चेअरमन

श्री. संजय सुदाम कडूस
चेअरमन

श्री. प्रशांत मुरलीधर लोखंडे
उपव्यवस्थापक

श्री. राजेंद्र दशरथ पवार
व्यवस्थापक

## –: संचालक मंडळ :–

श्री. प्रशांत नामदेव मोरे
श्री. विक्रम सुर्यभान ससे
श्री. विलास लहानु शेळके
श्री. अरुण लहानु जोर्वेकर
श्री. भाऊसाहेब सोन्याबापु चांदणे
इंजि. राजु ठकाजी दिघे
डॉ. दिलीप दत्तात्रय डांगे

श्री. चंद्रकांत फकिरा संसारे
श्री. ऋषिकेश कैलास बनकर
श्री. स्वप्नील सुखलाल शिंदे
श्रीमती ज्योती साहेबराव पवार
श्री. कल्याण रामदास मुटकुळे
श्री. सुधीर भानुदास खेडकर
श्री. श्रीकांत गोपीनाथ देशमाने

श्री. काशिनाथ बबन नरोडे
श्री. कैलास कारभारी डावरे
श्री. योगेंद्र महादेव पालवे
श्रीमती सुरेखा बबन महारनूर
श्रीमती मनिषा भिकचंद साळवे
श्री. अभिजीत अनिलसिंग पवार
श्री. चेतन रविंद्र चव्हाण

# पोटनियम दुरुस्ती

<table>
<tr><th>पोटनियम नंबर</th><th>हल्लीची पोटनियम शब्दरचना</th><th>दुरुस्तीनंतर होणारे पोटनियमाची शब्दरचना</th><th>दुरुस्तीचे कारण</th></tr>
<tr>
<td>३७ (फ)<br>१.१०</td>
<td>
<table>
<tr><td>१</td><td>रु. २५००१/-<br>ते ३००००/-<br>पर्यंत मासिक वेतनासाठी</td><td>रु. १०.००<br>लाख</td><td>रु. १०.००<br>लाख</td></tr>
<tr><td>२</td><td>रु. ३०००१/-<br>ते ३५०००/-<br>पर्यंत मासिक वेतनासाठी</td><td>रु. १५.००<br>लाख</td><td>रु. १५.००<br>लाख</td></tr>
<tr><td>३</td><td>रु. ३५००१/-<br>ते ४५०००/-<br>पर्यंत मासिक वेतनासाठी</td><td>रु. १६.००<br>लाख</td><td>रु. १६.००<br>लाख</td></tr>
<tr><td>४</td><td>रु. ४५००१/-<br>ते ५००००/-<br>पर्यंत मासिक वेतनासाठी</td><td>रु. १७.००<br>लाख</td><td>रु. १७.००<br>लाख</td></tr>
<tr><td>५</td><td>रु. ५०००१/-<br>ते ६००००/-<br>पर्यंत मासिक वेतनासाठी</td><td>रु. १८.००<br>लाख</td><td>रु. १८.००<br>लाख</td></tr>
<tr><td>६</td><td>रु. ६०००१/-<br>ते ६५०००/-<br>पर्यंत मासिक वेतनासाठी</td><td>रु. १९.००<br>लाख</td><td>रु. १९.००<br>लाख</td></tr>
<tr><td>७</td><td>रु. ६५००१/-<br>ते ७००००/-<br>पर्यंत मासिक वेतनासाठी</td><td>रु. २०.००<br>लाख</td><td>रु. २०.००<br>लाख</td></tr>
</table>
१)सभासदाला द्यावयाचे कर्ज हे त्याच्या मासिक वेतनाच्या ३० पटी पेक्षा जास्त किंवा वर नमूद तक्त्यानुसार १ मध्ये नमूद सुधारित कमाल मर्यादेपेक्षा जास्त नसावे<br><br>
२)सभासदांना द्यावयाच्या कर्जामध्ये सभासदाचे एकूण मासिक ढोबळ वेतनमान, कर्ज परतफेडीची क्षमता आणि वेतन प्रदान कायदा १९३६ मधील कलम ७ (३) (१) अन्वये नमूद केले प्रमाणे सर्व प्रकारच्या वैधानिक, आयकर व अन्य वजावटी आणि पूर्वी मंजूर करण्यात आलेल्या कर्जाच्या व आता मंजूर करण्यात येणा-या कर्जाच्या समान मासिक व्याज हप्त्या सह एकूण कपातीची रक्कम हि एकूण ढोबळ मासिक वेतनाच्या ७५% पेक्षा अधिक असता कामा नये. ३) सर्व साधारण कर्जाची परत फेडीची मुदत जास्तीत जास्त २०४ सारख्या मासिक हप्त्याची असेल त्यामध्ये जास्तीत जास्त १७ हप्त्याच्या वसुलीला तहकुबीला समावेश असेल आणि अशा तहकुबीस कार्यकारी मंडळाच्या मंजुरीची आवश्यकता राहील.कोणत्याही परिस्थितीत कर्ज फेडीची मर्यादा २०४ महिन्यापेक्षा जास्त असणार नाही. कर्ज परतफेडीच्या हप्त्याची संख्या ठरविताना सभासदाचा उर्वरित सेवा कालावधी विचारात घेतला जाईल.त्यानुसार मुद्दल हप्ता ठरविला जाईल.<br><br>
सर्वसाधारण कर्ज खालील कारणासाठी मिळेल.<br>
१. स्थावर मालमत्ता २. घरबांधणी ३. मुला मुलींचे लग्न ४.
</td>
<td>
<table>
<tr><td>१</td><td>रु. २५००१/-<br>ते ३००००/-<br>पर्यंत मासिक वेतनासाठी</td><td>रु. १०.००<br>लाख</td><td>रु. १०.००<br>लाख</td></tr>
<tr><td>२</td><td>रु. ३०००१/-<br>ते ३५०००/-<br>पर्यंत मासिक वेतनासाठी</td><td>रु. १५.००<br>लाख</td><td>रु. १५.००<br>लाख</td></tr>
<tr><td>३</td><td>रु. ३५००१/-<br>ते ४५०००/-<br>पर्यंत मासिक वेतनासाठी</td><td>रु. १६.००<br>लाख</td><td>रु. १६.००<br>लाख</td></tr>
<tr><td>४</td><td>रु. ४५००१/-<br>ते ५००००/-<br>पर्यंत मासिक वेतनासाठी</td><td>रु. १७.००<br>लाख</td><td>रु. १७.००<br>लाख</td></tr>
<tr><td>५</td><td>रु. ५०००१/-<br>ते ६००००/-<br>पर्यंत मासिक वेतनासाठी</td><td>रु. १८.००<br>लाख</td><td>रु. १८.००<br>लाख</td></tr>
<tr><td>६</td><td>रु. ६०००१/-<br>ते ६५०००/-<br>पर्यंत मासिक वेतनासाठी</td><td>रु. १९.००<br>लाख</td><td>रु. १९.००<br>लाख</td></tr>
<tr><td>७</td><td>रु. ६५००१/-<br>ते ७००००/-<br>पर्यंत मासिक वेतनासाठी</td><td>रु. २०.००<br>लाख</td><td>रु. २०.००<br>लाख</td></tr>
<tr><td>८</td><td>रु. ७०००१/-<br>ते ७५०००/-<br>पर्यंत मासिक वेतनासाठी</td><td>रु. २१.००<br>लाख</td><td>रु. २१.००<br>लाख</td></tr>
</table>
१)सभासदाला द्यावयाचे कर्ज हे त्याच्या मासिक वेतनाच्या ३० पटी पेक्षा जास्त किंवा वर नमूद तक्त्यानुसार १ मध्ये नमूद सुधारित कमाल मर्यादेपेक्षा जास्त नसावे<br><br>
२)सभासदांना द्यावयाच्या कर्जामध्ये सभासदाचे एकूण मासिक ढोबळ वेतनमान, कर्ज परतफेडीची क्षमता आणि वेतन प्रदान कायदा १९३६ मधील कलम ७ (३) (१) अन्वये नमूद केले प्रमाणे सर्व प्रकारच्या वैधानिक, आयकर व अन्य वजावटी आणि पूर्वी मंजूर करण्यात आलेल्या कर्जाच्या व आता मंजूर करण्यात येणा-या कर्जाच्या समान मासिक व्याज हप्त्या सह एकूण कपातीची रक्कम हि एकूण ढोबळ मासिक वेतनाच्या ७५% पेक्षा अधिक असता कामा नये. ३) सर्व साधारण कर्जाची परत फेडीची मुदत जास्तीत जास्त २०४ सारख्या मासिक हप्त्याची असेल त्यामध्ये जास्तीत जास्त १७ हप्त्याच्या वसुलीला तहकुबीला समावेश असेल आणि अशा तहकुबीस कार्यकारी मंडळाच्या मंजुरीची आवश्यकता राहील.कोणत्याही परिस्थितीत कर्ज फेडीची मर्यादा २०४ महिन्यापेक्षा जास्त असणार नाही. कर्ज परतफेडीच्या हप्त्याची संख्या ठरविताना सभासदाचा उर्वरित सेवा कालावधी विचारात घेतला जाईल.त्यानुसार मुद्दल हप्ता ठरविला जाईल.
</td>
<td>सहकार आयुक्त व निबंधक व सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या परिपत्रका प्रमाणे</td>
</tr>
</table>

# पोटनियम दुरुस्ती

| पोटनियम नंबर | हल्लीची पोटनियम शब्दरचना | दुरुस्तीनंतर होणारे पोटनियमाची शब्दरचना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| | पाल्याचे उच्च तांत्रिक शिक्षण , वैद्यकीय अभियांत्रिकी शिक्षण ५. धार्मिक कार्यक्रम ६. हृदय शस्त्रक्रिया इ. खर्चिक वैद्यकीय उपचार ७. वाहनखरेदी, दोनचाकी चार चाकी<br>४)१ तारखेनंतर कर्ज घेणा–या सभासदांना पूर्ण महिन्याची व्याजाची आकारणी केली जाईल.<br>५) १५ तारखेनंतर नवीन कर्ज घेणा–या सभासदांना अर्ध्या महिन्याची व्याजाची आकारणी केली जाईल.<br>६)सभासदांना कर्ज मंजूर करतांना एकूण कर्जाच्या १०% रक्कम शेअर्स खाती जमा केली जाईल.<br>७) सभासदांना प्रत्येकवेळी कर्ज मंजूर करताना एकूण कर्जाच्या १०% रक्कम कायम निधी मध्ये जमा केली जाईल.<br>८)१५ तारखेनंतर नुतनीकरण करणा–या सभासदांना चेकच्या रक्कमेला अर्ध्या महिन्याची व्याजाची आकारणी केली जाईल.<br>९) सभासदांनी कर्ज घेताना स्थावर मालमत्तेचे मॉर्गेज करून देणे बंधनकारक राहील आणि ऑनलाईन पगार स्लीपवर कर्ज मंजूर केले जाईल.<br>१०) पूर्वी घेतलेल्या सर्व साधारण कर्जास ६ महिने पुर्ण झाल्याशिवाय नवीन कर्ज मागणी अर्ज स्वीकारला जाणार नाही.<br>११) सभासदांच्या सेवानिवृत्तीस तीन वर्ष बाकी असतांना सर्वसाधारण कर्ज मंजूर होणार नाही.<br>१२) सभासदांनी एक वर्षात ३१ मार्च पर्यंत जेवढे हप्ते कपात करून दिलेले नाहीत तेवढी वर्गणी व व्याजाची रक्कम कर्ज व कायमनिधी नावे टाकून वसूल केली जाईल.<br>१३) कर्जदार व जामीनदार यांनी घेतलेल्या कर्जाचा लेखी करारनामा संस्थेच्या नावाने करून देणे बंधनकारक राहील.<br>१४) कमीत कमी दोन सभासदांच्या वैयक्तिक जामिनकीवर कर्ज दिले जाईल मात्र एका सभासदास दोन पेक्षा अधिक कर्जदारास जामीन राहाता येणार नाही.<br>१५) ज्या सभासदांची संस्थेने ठरविल्या प्रमाणे संस्थेस येणे रक्कम नियमित पणे येत नसेल तर त्याला कर्ज मागण्याचा अधिकार राहणार नाही.त्याने दरमहाची वर्गणी व इतर येणी पूर्ण करावी लागतील.<br>१६) कर्जावरील व्याजाचा दर ठरविण्याचा अधिकार व्यवस्थापक समितीस राहील. मात्र हा व्याजाचा दर दरसाल दर शेकडा ६ ते १२% जिल्हा बँकेचे कर्ज घेतल्यास बँक ज्या व्याजाचे दराने कर्ज देते त्या दरापेक्षा ३ टक्के पर्यत जादा व्याजदर ठेवला जाईल. | सर्वसाधारण कर्ज खालील कारणासाठी मिळेल.<br>१. स्थावर मालमत्ता २. घरबांधणी ३. मुला मुलींचे लग्न ४. पाल्याचे उच्च तांत्रिक शिक्षण , वैद्यकीय अभियांत्रिकी शिक्षण ५. धार्मिक कार्यक्रम ६. हृदय शस्त्रक्रिया इ. खर्चिक वैद्यकीय उपचार ७. वाहनखरेदी, दोनचाकी चार चाकी<br>४)१ तारखेनंतर कर्ज घेणा–या सभासदांना पूर्ण महिन्याची व्याजाची आकारणी केली जाईल.<br>५) १५ तारखेनंतर नवीन कर्ज घेणा–या सभासदांना अर्ध्या महिन्याची व्याजाची आकारणी केली जाईल.<br>६)सभासदांना कर्ज मंजूर करतांना एकूण कर्जाच्या १०% रक्कम शेअर्स खाती जमा केली जाईल.<br>७) सभासदांना प्रत्येकवेळी कर्ज मंजूर करताना एकूण कर्जाच्या १०% रक्कम कायम निधी मध्ये जमा केली जाईल.<br>८)१५ तारखेनंतर नुतनीकरण करणा–या सभासदांना चेकच्या रक्कमेला अर्ध्या महिन्याची व्याजाची आकारणी केली जाईल.<br>९) सभासदांनी कर्ज घेताना स्थावर मालमत्तेचे मॉर्गेज करून देणे बंधनकारक राहील आणि ऑनलाईन पगार स्लीपवर कर्ज मंजूर केले जाईल.<br>१०) पूर्वी घेतलेल्या सर्व साधारण कर्जास ६ महिने पुर्ण झाल्याशिवाय नवीन कर्ज मागणी अर्ज स्वीकारला जाणार नाही.<br>११) सभासदांच्या सेवानिवृत्तीस तीन वर्ष बाकी असतांना सर्वसाधारण कर्ज मंजूर होणार नाही.<br>१२) सभासदांनी एक वर्षात ३१ मार्च पर्यंत जेवढे हप्ते कपात करून दिलेले नाहीत तेवढी वर्गणी व व्याजाची रक्कम कर्ज व कायमनिधी नावे टाकून वसूल केली जाईल.<br>१३) कर्जदार व जामीनदार यांनी घेतलेल्या कर्जाचा लेखी करारनामा संस्थेच्या नावाने करून देणे बंधनकारक राहील.<br>१४) कमीत कमी दोन सभासदांच्या वैयक्तिक जामिनकीवर कर्ज दिले जाईल मात्र एका सभासदास दोन पेक्षा अधिक कर्जदारास जामीन राहाता येणार नाही.<br>१५) ज्या सभासदांची संस्थेने ठरविल्या प्रमाणे संस्थेस येणे रक्कम नियमित पणे येत नसेल तर त्याला कर्ज मागण्याचा अधिकार राहणार नाही.त्याने दरमहाची वर्गणी व इतर येणी पूर्ण करावी लागतील.<br>१६) कर्जावरील व्याजाचा दर ठरविण्याचा अधिकार व्यवस्थापक समितीस राहील. मात्र हा व्याजाचा दर दरसाल दर शेकडा ६ ते १२% जिल्हा बँकेचे कर्ज घेतल्यास बँक ज्या व्याजाचे दराने कर्ज देते त्या दरापेक्षा ३ टक्के पर्यत जादा व्याजदर ठेवला जाईल. | |

# अहिल्यानगर जिल्हा परिषद सर्व्हन्टस् को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. अहिल्यानगर
# संस्थेच्या ९८ व्या अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

| | |
|---|---|
| | वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. ०७/०६/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता<br>स्थळ - लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, टिळक रोड, अहिल्यानगर<br>सभेत सहभागी सभासद संख्या : ४२२ |
| **श्री. कल्याण मुटकुळे चेअरमन** | शनिवार दि. ०७/०६/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता अहिल्यानगर जिल्हा परिषद सर्व्हन्टस को ऑप क्रेडीट सोसायटी लि., अहिल्यानगर या संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी आवश्यक असलेला कोरम पूर्ण झाल्याने संस्थेचे चेअरमन श्री. कल्याण मुटकुळे यांनी प्रमुख पाहुणे श्री. रमेश कासार, लेखाधिकारी, समग्र शिक्षा अभियान जिल्हा परिषद अहिल्यानगर, व्याख्याते श्री. राहुल गिरी उपस्थित सभासद, पत्रकार बंधु व सभासदांच्या गुणवंत पाल्याचे स्वागत करण्यात आले. |
| **विषय क्र. १** | सन्माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक जि.प. अहिल्यानगर याना सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारणे बद्दल विनंती करणे. |
| **श्री. विलास शेळके संचालक** | अहिल्यानगर जिल्हा परिषद सर्व्हन्टस को ऑप क्रेडीट सोसायटी लि., अहिल्यानगर संस्थेच्या ९८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्षस्थान श्री. रमेश कासार, लेखाधिकारी, समग्र शिक्षा अभियान जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना स्विकारणे बाबत विनंती केली. |
| **श्रीमती ज्योती पवार संचालिका** | आमचे सहकारी श्री विलास शेळके यांनी अहिल्यानगर जिल्हा परिषद सर्व्हन्टस को ऑप क्रेडीट सोसायटी लि. अहिल्यानगर संस्थेच्या ९८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्षस्थान श्री रमेश कासार, लेखाधिकारी, समग्र शिक्षा अभियान जिल्हा परिषद अ.नगर यांना स्विकारणे बाबत सुचना मांडली त्यास मी अनुमोदन देत आहे. |
| **श्री. रमेश कासार लेखाधिकारी, समग्र शिक्षा अभियान जि.प., अ.नगर** | अहिल्यानगर जिल्हा परिषद सर्व्हन्टस को ऑप क्रेडीट सोसायटी लि. अहिल्यानगर संस्थेच्या ९८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, टिळकरोड अहिल्यानगर येथे आयोजित केलेली आहे. विषय पत्रिकेवरील विषयाप्रमाणे प्रत्येक विषयावर सविस्तर चर्चा करून सर्वांची मते विचारात घेवून विषय मंजूर करण्यात येतील. सभासदांनी प्रत्येक विषयावर आपले मत मांडावे व सभेला सर्वांनी सहकार्य करावे. |
| **ठराव नं. १** | सभेच्या अध्यक्षस्थानी श्री रमेश कासार, लेखाधिकारी, समग्र शिक्षा अभियान जिल्हा परिषद अहिल्यानगर यांनी ९८ वी वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारावे तसेच प्रमुख पाहुणे यांनी आसन ग्रहण करावे अशी सूचना संस्थेचे संचालक श्री. विलास शेळके यांनी मांडली त्यांनी मांडलेल्या सूचनेस संचालिका श्रीमती ज्योती पवार यांनी अनुमोदन दिले. तदनंतर श्री रमेश कासार, लेखाधिकारी, समग्र शिक्षा अभियान जिल्हा परिषद अहिल्यानगर यांनी ९८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष स्थान स्विकारल्याचे जाहीर करून आजच्या सभेचे दिप प्रज्वलन करून कामकाज खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन सर्व उपस्थित सभासदांना केले व सभेच्या कामकाजास विषय पत्रिके प्रमाणे सुरुवात झाली.<br>**सूचक :- श्री विलास लहानू शेळके अनुमोदक :- श्रीमती ज्योती साहेबराव पवार**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| **विषय क्र. २** | अहवाल सालातील दिवंगताना श्रध्दाजंली अर्पण करणे. |
| **ठराव नं. २** | अहवाल सालामध्ये दिवंगत झालेले संस्थेचे सभासद, संस्थेचे माजी संचालक, महाराष्ट्राचे स्वातंत्रसेनानी, थोर नेते, तंत्रज्ञ, संशोधक, शास्त्रज्ञ, कवी, लेखक, साहित्यीक, कलावंत, शिक्षण तज्ञ, खेळाडू, सामजिक कार्यकर्ते, तसेच सीमा रेषेवरील जवान, खातेदार, ठेवीदार, व हितचिंतक ज्ञात अज्ञात दिवंगत झाले या सर्वाना भावपुर्ण श्रध्दाजंली अर्पण करून ईश्वर त्यांचे |

| | |
|---|---|
| | आत्म्यास चिरशांती व सदगती लाभो. ही ईश्वर चरणी प्रार्थना करून दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.<br>**सूचक :- श्री प्रशांत नामदेव मोरे अनुमोदक :- श्रीमती सुरेखा बबन महारनूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| | उपस्थित पाहुण्यांचा सत्कार<br>आजच्या सभेचे अध्यक्ष श्री रमेश कासार, लेखाधिकारी, समग्र शिक्षा अभियान जिल्हा परिषद अहिल्यानगर प्रमुख पाहुणे व्याख्याते श्री राहुल गिरी, यांचा व पत्रकार, प्रेस फोटोग्राफर श्री सचिन शिंदे, श्री सुनिल हारदे, श्री दिपक कांबळे, श्री गणेश देलमाडे, श्री ज्ञानेश दुधाडे, श्री अशोक निंबाळकर, श्री विक्रम बनकर, निवेदक श्री उध्दव काळापहाड यांचा सत्कार संस्थेचे चेअरमन, व्हा.चेअरमन, संचालक मंडळ यांच्या शुभ हस्ते शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी दैनिक पुढारीचे श्री गोरक्षनाथ शेजुळ यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. |
| **विषय क्र. ३** | मा. अध्यक्ष यांच्या शुभहस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषक वितरण करणे. |
| | सभासदांच्या गुणवंत पाल्यांचे पारितोषिक कार्यक्रम वितरण पूर्वी प्रसिध्द व्याख्याते श्री. राहुल गिरी यांनी सभासदांच्या पाल्यांना भविष्यातील शिक्षणाबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. |
| **ठराव नं. ३** | संस्थेने सालाबाद प्रमाणे सभासदांचे हुशार गुणवंत मुला–मुलींना शैक्षणिक सांस्कृतिक, क्रीडा व इतर क्षेत्रात विशेष गुणवत्ता प्राप्त झालेल्यांसाठी ९८ व्या वार्षिक सर्व साधारण सभेमध्ये प्रोत्साहनपर बक्षिस व प्रशस्तीपत्र ठेवलेले आहे. सदर बक्षिसासाठी मुदतीत आलेल्या व पारितोषकासाठी पात्र विद्यार्थ्यांची नावे सन २०२४–२०२५ च्या वार्षिक अहवालामध्ये प्रसिध्द केलेली आहेत. सभासदांच्या गुणवंत व हुशार मुला, मुलींना प्रोत्साहान मिळावे या उद्देशाने ही बक्षिस योजना सभासदांच्या मान्यतेने सभासद कल्याण निधी योजनेतून राबविण्यात येत आहे. सभेचे अध्यक्ष श्री रमेश कासार, लेखाधिकारी, समग्र शिक्षा अभियान जिल्हा परिषद अहिल्यानगर प्रमुख पाहुणे व्याख्याते श्री राहुल गिरी, संस्थेचे चेअरमन श्री कल्याण मुटकुळे, व्हा.चेअरमन श्रीमती मनिषा साळवे, संस्थेचे संचालक मंडळ यांच्या शुभहस्ते गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना बक्षिसाची रक्कम, प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह व रोख रक्कम देवून गौरविण्यात आले. तसेच सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येवून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या आणि प्रसिध्द व्याख्याते श्री. राहुल गिरी यांनी सभासदांच्या पाल्यांना भविष्यातील शिक्षणाबाबत मोलाचे मार्गदर्शन केले त्याबद्दल संस्थेने त्यांचे आभार मानले.<br>**सूचक :- श्री ऋषिकेश कैलास बनकर अनुमोदक :- श्री सुधीर भानुदास खेडकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| **विषय क्र. ४** | मागील दि. ०९/०६/२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे व मंजुर ठरावावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वाचन करणे. |
| **राजेंद्र पवार व्यवस्थापक** | मागील सभेचे इतिवृत्त मंजुरीसाठी ठेवलेले आहे. त्या इतिवृत्तात काही दुरुस्ती असेल किंवा इतिवृत्ता संदर्भात काही सुचना करावयाच्या असल्यास सभासदांकडून सांगण्यात याव्यात. |
| **श्री. सोमनाथ भिटे सभासद** | ९८ व्या वार्षिक सभेचा जो अहवाल छपाई केला आहे, त्यात महापुरुषांच्या फोटोंमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा फोटो छापायला हवा होता. |
| **श्री. कल्याण मुटकुळे चेअरमन** | अहवालात नजर चुकीने फोटो छापायचा राहिलेला असून त्याबद्दल आम्ही संचालक मंडळाच्या वतीने दिलगिरी व्यक्त करतो व भविष्यात अशी चूक होणार नाही याची काळजी घेवू. तसेच आज सभा सुरु होण्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आलेले आहे. |
| **श्री गणेश चने सभासद** | यापुढील काळात अहवाल छपाई करतांना वरील बाबत काळजी घेण्यात यावी. |
| **श्री कल्याण मुटकुळे चेअरमन** | सुचनांचे पालन केले जाईल. |

| | |
|---|---|
| **श्री विकास साळुंके सभासद** | आजी माजी सभासद, कर्मचारी, संचालक मंडळ या सर्वांच्या सहकार्याने आपल्या या कामधेनु असलेल्या संस्थेचा वटवृक्ष झाल्याचे पाहायला मिळत आहे. संस्थेचा लौकिक यापुढेही कायम राहण्यासाठी प्रयत्न करण्याचे मी सर्वांना आवाहन करतो. इतिवृत्तावर चर्चा करत असताना मागील सभेत सभा झाल्यावर संस्थेच्या संकेतस्थळावर इतिवृत्त लवकरात लवकर प्रसिद्ध करण्याबाबत चर्चा झाली होती. त्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही. |
| **श्री राजेंद्र पवार व्यवस्थापक** | वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त लवकरात लवकर प्रसिध्द करण्यात येईल. |
| **श्री विकास साळुंके सभासद** | इतिवृत्त प्रसिद्ध करताना कोणतेही मुद्दे वगळू नका, पोटनियम दुरुस्तीला जिल्हा उपनिबंधकांची मंजुरी घ्यावी लागते, त्यास विलंब होवू शकतो. त्यामुळे पोटनियम दुरुस्तीचे विषय अहवालात छापा, परंतु इतर इतिवृत्त लवकरात लवकर प्रसिध्द करण्यात यावे. |
| **श्री. संजय कडूस संचालक** | सन्माननीय सभासद श्री विकास साळुंके यांनी मांडलेल्या सूचनेचे पालन केले जाईल. |
| **श्री. विजय कोरडे सभासद** | संचालक मंडळ व संस्थेच्या व्यवस्थापक आणि कर्मचाऱ्यांनी सभासदांनी केलेल्या सूचनांचे पालन करावे, सभेचा अहवाल सभासदांना अभ्यास करण्यासाठी किमान २१ दिवस अगोदर मिळेल याची दक्षता घेण्यात यावी. |
| **श्री. शिवहरी दराडे सभासद** | सध्याचे युग हे डिजिटल युग असून संस्थेचा वार्षिक सभेचा अहवाल छपाई बंद करून तो डिजिटल स्वरुपात प्रसिद्ध करणे शक्य आहे का? याचा विचार व्हावा. |
| **श्री. सोमनाथ भिटे सभासद** | अहवालात काही त्रुटी आहेत, त्या पुढील काळात होणार नाहीत याची दक्षता संचालक मंडळाने घ्यावी. |
| **श्री. मनोज चोभे श्री. विशाल महाजन सभासद** | वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त लवकरात लवकर प्रसिद्ध करावे हे सहकार कायद्यात नमूद आहे, त्यामुळे त्यनुसार संचालक मंडळाकडून कार्यवाही करण्यात यावी. |
| **श्री. प्रवीण राऊत श्री. विशाल महाजन सभासद** | संचालक मंडळाचे कामकाज चांगल्या पद्धतीने चालू असून किरकोळ कारणावरून कोणीही वाद घालू नये, व्यवस्थित चर्चा करण्यात यावी. |
| **श्री. अशोक काळापहाड सेवानिवृत्त सभासद** | पुढील वार्षिक सर्वसाधारण सभेत सेवानिवृत्त सभासदांना आमंत्रित करण्यात यावेत. |
| **श्री संजय कडूस संचालक** | संस्थेने ब वर्ग सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेस आमंत्रित केलेले आहे काही सेवानिवृत्त ब वर्ग सभासद आजच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित असून पुढील वार्षिक सर्वसाधारण सभेस सर्व ब वर्ग सभासदाना आमंत्रित केले जाईल. |
| **ठराव नं. ४** | मागील दिनांक ०९/०६/२०२४ रोजी झालेल्या ९७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संस्थेचे चेअरमन श्री कल्याण मुटकुळे यांनी सविस्तर वाचन केल्यानंतर सभासदांच्या सुचनांची नोंद घेऊन त्यावर चर्चा होऊन दिनांक ०९/०६/२०२४ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.<br>**सुचक :- श्री विकास भास्कर साळुंके** **अनुमोदक :- श्री शिवहरी त्रिंबक दराडे**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| **विषय क्र.५** | सन २०२४-२०२५ सालचे मा. संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल ताळेबंद नफा तोटा पत्रक व इत्यादी हिशोबांच्या पत्रकांना मंजुरी देणे |

| | |
|---|---|
| श्री. विकास साळुंके सभासद | या अहवालातील कायम निधी वरील व्याज, तरतूदी या आकडेवारी बाबत सभासदांना त्या समजून सांगण्यात याव्यात सर्व लेखाशिर्षांची यादी करावी, अनावश्यक तरतुदी वाढविल्यामुळे त्याचा परिणाम सभासदांना मिळणाऱ्या लाभांशावर होवू शकतो सभासद कुटुंब आधार योजना विमा योजनेतील मुदत ठेव पावतीवर मिळणारे व्याज उत्पन्नात न धरता सभासद कुटूंब आधार योजनेत जमा करण्यात यावेत सभासद कुटूंब आधार योजनेचा उद्देश ठेवीच्या व्याजावर भविष्यात योजना चालली पाहिजे त्याची अंमलबजावणी करण्यात यावी. ज्या सभासदांचे योजनेअंतर्गत कर्ज माफ करणे बाकी आहे त्याची यादी अहवालात प्रसिध्द करण्यात यावी. व एकूण कर्ज बाकी व वारसाला द्यावयाचा लाभ याची आकडेवारी अहवालात देण्यात यावी तसेच सदर योजनेला चार वर्ष पूर्ण होत असून त्याबाबत आढावा घेण्यात येईल. कुठलीही संस्था हि सभासदांच्या ठेवीवर स्वभांडवली होत नसते त्यामुळे ती सभासदांच्या भाग भांडवलावर होत असते त्यामुळे संस्थेचे उत्पन्न वाढीसाठी या पुढील काळात प्रयत्न व्हावेत तसेच संस्थेच्या कार्यालयात वीज बील बचतीबाबत सौर उर्जा प्रकल्प राबविण्यात यावा. |
| श्री. कल्याण मुटकुळे चेअरमन | ही सूचना अतिशय महत्वाची आहे, लवकरात लवकर सर्व प्रक्रिया पूर्ण करून संस्थेच्या कार्यालयात सौर प्रकल्प कार्यान्वित करण्यात येईल. |
| श्री. शिवहरी दराडे<br>श्री. राजु फरताळे<br>सभासद | सध्याचा काळ हा ग्रीन एनर्जीचा असल्याने हा प्रकल्प तातडीने राबवावा, तसेच संस्थेच्या ब वर्ग सभासदांनी ठेवी ठेवलेल्या आहेत, त्यांना वार्षिक सभेस बोलविण्यात यावे त्यांच्या सूचना विचारात घ्याव्यात |
| श्री. कल्याण मुटकुळे चेअरमन | सभासद दराडे यांनी मांडलेल्या अहवाल छपाई बंद करण्याच्या सुचणे बाबत इतर सभासदांनी आपले मत मांडावे. |
| श्री. विकास साळुंके सभासद | १०० टक्के छपाई बंद करता येणार नाही, ते योग्य होणार नाही. |
| श्री. मनोज चोभे<br>श्री. विकी दिवे<br>सभासद | छपाई खर्च वाचविण्यासाठी अहवालात काही जाहिराती घेण्यात याव्यात |
| श्री. संजय कडूस संचालक | अहवाल छपाई बाबत सर्वांशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल. |
| श्री. विकास साळुंके<br>श्री. संदीप अकोलकर<br>सभासद | संस्थेची कर्ज वसुली चांगली आहे, परंतु भविष्यात काही अडचणी येवू नये यासाठी जे सभासद सेवानिवृत्तीच्या जवळ आले आहेत. त्यांना कर्ज मंजूर करताना त्यांची सेवा किती महिने राहिली आहे. ते परतफेड कशी करणार याबाबत विचार करून कर्ज मंजूर करण्यात यावे. |
| श्री. संजय कडूस संचालक | याबाबत पोटनियम दुरुस्ती साठी जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडे पाठविण्यात येईल. |
| श्री. अरुण जोर्वेकर संचालक | काही सभासदांना वैद्यकीय कारणास्तव किंवा अन्य काही महत्वाच्या कामासाठी काही रकमेच्या कर्जाची आवश्यकता भासते, त्यामुळे कर्ज नवे जुने करून दिले जाते. |
| श्री. विकास साळुंके सभासद | पोटनियम दुरुस्तीमध्ये शेअर्सचे रुपांतर मासिक वर्गणीत करण्यात यावे. अशी दुरुस्ती सुचविलेली आहे. अशा प्रकारची पोटनियम दुरुस्ती करण्यात येवू नये नफ्यावर बसणा–या टॅक्स बाबत वेगळा विचार करण्यात यावा. |
| श्री. संजय कडूस संचालक | याबाबत लेखापरीक्षक यांच्याशी चर्चा करून इन्कम टॅक्स बाबत निर्णय घेण्यात येईल. |
| श्री. संदीप मुखेकर सभासद | सभासद लाभांशाची वाट पाहत आहेत, अगोदर तो विषय मंजूर करा, नंतर चर्चा सुरु राहुद्या |
| श्री. तुळशीराम धोत्रे सभासद | सभेत सर्व विषयांवर चर्चा सुरूच राहील, पण लाभांश वेळेत वितरीत करा. |

| | |
|---|---|
| **इंजि. हेमंत परांडकर सभासद** | आपल्या संस्थेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी आदर्श कर्मचारी पुरस्कार सुरु करून दरवर्षी एका कर्मचाऱ्याला वार्षिक सर्वसाधारण सभेत गौरवण्यात याव |
| **श्री. अभय गट<br>श्री. अनिल पंडित<br>सभासद** | इंजि. हेमंत परांडकर यांनी मांडलेली सूचना चांगली असून त्यास मी अनुमोदन देतो |
| **श्री. मनोहर डीसले<br>श्री. संदीप अकोलकर<br>श्री. भाऊसाहेब जाधव<br>सभासद** | संस्थेच्या सभासदांना कर्ज वितरण करतांना २५% पगार मिळाला पाहिजे या दृष्टीने कर्ज वितरण केले पाहिजे त्याची दक्षता घेण्यात यावी. त्यामुळे थकबाकी वाढणार नाही आणि थकबाकीदार सभासदांचा बोजा जामीनदारावर पडणार नाही याची काळजी घेण्यात यावी. |
| **श्री. अभय गट<br>सभासद** | सर्व अनुशंगीक बाबींचा उल्लेख अहवालात करण्यात यावा त्यामळे संस्थेने राबविलेल्या सर्व योजना सभासदांपर्यंत अहवालाच्या माध्यमातून जातात. |
| **श्री. सचिन बनकर<br>श्री. नारायण बोराडे<br>सभासद** | संस्थेच्या सार्वजनिक कार्यासाठी अंशदान फंडा मधून सभासदांच्या पाल्यासाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनासाठी निधी वापरण्यात यावा. |
| **श्री. कल्याण मुटकुळे<br>चेअरमन** | सार्वजनिक कार्यासाठी अंशदानफंडाची रक्कम ही कमी प्रमाणात असल्याने इतर योजना राबविणे शक्य होणार नाही त्यासाठी वेगळा निधी उभारावा लागेल. |
| **ठराव नं.५** | संस्थेचे व्यवस्थापक श्री राजेंद्र दशरथ पवार यांनी प्रथम सन २०२४-२०२५ वर्षाच्या वार्षिक अहवालाचे सभेमध्ये सविस्तर वाचन केले त्यानंतर २०२४-२०२५ सालचे ताळेबंद, नफा तोटा पत्रक मंजुरीसाठी सादर केले व त्यावर थोडक्यात विवेचन केले सभासदांनी विचारलेल्या प्रश्नावर चेअरमन संचालक व व्यवस्थापक यांनी समर्पक उत्तरे दिली अहवाल सालात आवश्यक त्या तरतुदी व गुंतवणूक केलेली असून सर्वसाधारण कर्जामध्ये व ठेवीमध्ये दिवसेदिवस मोठ्या प्रमाणात वाढ होत असून पारदर्शी कारभार व सभासदांची विश्वासर्हता यामुळे ठेवीचे प्रमाणात सुध्दा गेल्या काही वर्षामध्ये सातत्याने वाढ झालेली आहे. संस्थेने कॅश क्रेडीट कमीत कमी वापरले असून व खर्चात काटकसर आवश्यक त्या सर्व तरतुदी केल्यामुळे संस्थेस रु. ५३८०८=५० इतका शिल्लक नफा राहिलेला आहे. संस्थेला दरवर्षी होणा-या निव्वळ नफ्यावर आयकर भरावा लागणार आहे. निव्वळ नफ्यावर आयकर भरण्याबाबत नोटीस आलेली आहे. त्यामुळे भविष्यात आयकर कमी करण्यासाठी संस्थेला जे इतर उत्पन्न मिळते. त्यामधून आवश्यक त्या तरतुदी व आस्थापना खर्च करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. त्यानंतर २०२४-२०२५ सालचा ताळेबंद नफा तोटा पत्रकास मंजुरी देण्यात आली.<br>**सुचक :- श्री अभय जनार्दन गट अनुमोदक :- श्री मनोज पोपट चोभे**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| **विषय क्र. ६** | सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात अंदाज पत्रकापेक्षा कमी जास्त झालेल्या खर्चास सन २०२५-२०२६ उत्पन्नाचे व खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता देणे. |
| **श्री. निलेश गाडेकर<br>सभासद** | नुकत्याच २७ मे रोजी नगर तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे खडकी येथे राहणारे संस्थेचे सभासद शरद पवार यांच्या घरात पुराचे पाणी घुसून त्यांचे घरातील सर्व संसारोपयोगी साहित्याचे नुकसान झाले आहे. त्यांना मदत करता आली तर बरे होईल. |
| **श्री. कल्याण मुटकुळे<br>चेअरमन** | तशी तरतूद करता येणार नाही परंतु या आपत्तीत त्यांना मदत करण्यासाठी सर्व संचालक मंडळाकडून व्यक्तिगत २५ हजारांची मदत देण्यात येईल. |
| **श्री. शरद पवार<br>सभासद** | संचालक श्री संजय कडूस यांनी माझ्या घरी भेट देवून पाहणी केली व मला लगेच २५ हजारांची वैयक्तिक मदत केली आहे. त्यांना खूप खूप धन्यवाद तसेच संचालक मंडळाचेही आभार. |

| | |
|---|---|
| श्री. दीपक गोधडे<br>श्री. हरी शेळके<br>सभासद | संस्थेच्या सभासदांना नैसर्गिक आपत्तीच्या काळात मदत करण्याची तरतूद करता येत असेल तर त्याबाबत विचार करण्यात यावा. |
| श्री. विकास साळुंके<br>सभासद | तशी तरतूद करता येत नाही, मात्र संस्थेच्या वतीने आपत्ती निवारण कक्षाकडे मदतीसाठी पाठपुरावा करण्यात यावा. तसेच मेडिक्लेम विमा पॉलीसी बाबत विचार करण्यात यावा. |
| श्री. चंद्रशेखर वांढेकर<br>सभासद | संस्थेच्या वतीने महत्वाचे निर्णय घेताना सर्वांना विश्वासात घेण्यात यावे. |
| श्री सोमनाथ भिटे<br>सभासद | संस्थेच्या वतीने बांधण्यात येत असलेल्या नवीन इमारतीच्या बांधकामाचे अंदाजपत्रक सभासदांपुढे मांडण्यात यावे |
| श्री. अभय गट<br>श्री. गणेश पवार<br>सभासद | संस्थेचा आणि संचालक मंडळाचा कारभार पारदर्शक असल्याचे बोलले जाते, त्यामुळे संस्थेच्या वतीने केलेली जागा खरेदी तसेच नवीन इमारत बांधकाम याबाबत पारदर्शकता पाळण्यात यावी. |
| श्री. मनोज चोभे<br>सभासद | जागा खरेदी, इमारत बांधकाम याचे अंदाजपत्रक सभासदांच्या पुढे मांडा, त्यामुळे कुणाच्याही मनात शंका येणार नाही |
| श्री. अशोकराव कदम<br>सभासद | ज्या प्रमाणे नगरमध्ये जागा खरेदी केली तशाच पद्धतीने संगमनेर मध्ये हि जागा खरेदी करता येईल का? तेथे काही उपक्रम राबवता येईल का? याचा विचार व्हावा. |
| श्री संजय कडूस<br>संचालक | नवीन इमारत बांधकाम याबाबत चर्चा करण्यासाठी विषय पत्रिकेवर विषय क्र. १४ चर्चेसाठी ठेवण्यात आलेला आहे. त्या पूर्वी चर्चा नको सध्या सभासद लाभांशच्या मेसेज ची वाट पाहत आहेत. नफा वाटणी आणि लाभांश वाटपाच्या विषयाला मंजुरी देण्यात यावी, जेणेकरून लाभांश सभासदांच्या खात्यावर जमा करण्याची प्रक्रिया सुरु करता येईल. |
| श्री. राजेंद्र पवार<br>व्यवस्थापक | आपल्या सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |
